दि. 06/09/2026

प्रेसनोट

# हिंगोलीत जुगार अड्ड्यावर पोलीस उप महानिरीक्षकांच्या पथकाची धाड

## (18) इसमांविरुद्ध कारवाई, (18) लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्याकडील पोलीस पथक हिंगोली जिल्ह्यात पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक 05/09/2026 रोजी सायंकाळी 5.30 वाजता, हिंगोली शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, अजिंक्य सुदामराव नागरे याचे कॉम्प्लेक्समधील पत्र्याचे गाळ्यात छापा टाकला असता, सदर ठिकाणी उपस्थित असणारे लोक, पैसे लावून झन्ना-मन्ना नावाचा जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले. त्यांच्याकडील, उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी केली असता, सदर ठिकाणी दोस्ती मित्र मंडळ चॅरिटेबल ट्रस्ट, जिल्हा ठाणे यांचे लायसेन्सचे नावाखाली झन्ना-मन्ना नावाचा जुगार खेळला जात असल्याचे व तो अजिंक्य सुदामराव नागरे यांचे मार्फत खेळविला जात असल्याचे पथकास आढळून आले.

सदर कारवाईत पोलिसांनी, संबंधितांकडून 2,16,020/- रुपयांची रोकड, (15) मोबाईल, (1) चारचाकी वाहन व (8) मोटार सायकली असा एकूण 18,47,020/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत, हिंगोली शहर पोलीस ठाणे येथे गु. र.न. 691/2026 कलम 4, 5 मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, त्याचा तपास हिंगोली शहर पोलीस ठाण्यातील सपोनि बनसोडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

**' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड